# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
## शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद
## बैठक क्र. ६६ दिनांक. ११.०७.०२५

## इतिवृत्त

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. ६६ दि. ११.०७.२०२५ रोजी दुपारी ०२.३० ते ०४.३० या वेळेत प्रत्यक्ष व online पद्धतीने घेण्यात आली. सदर बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते.

- प्रा. संजीवनी महाले प्रोफेसर, अध्यक्ष व संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा
- , डॉ. भरतभाई जोशी, प्राध्यापक, गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद
- डॉ. चंद्रकांत बाविस्कर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
- डॉ. चेतना सोनकांबळे, प्राध्यापक, श्री शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- डॉ. निशा वळवी, सहयोगी प्राध्यापक, सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
- डॉ. चेतना कमळस्कर, संचालक, विज्ञान विद्याशाखा
- डॉ. प्रविण घोडेस्वार, प्राध्यापक, विद्यार्थी सेवा विभाग
- डॉ. लतिका गायकवाड, सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विद्याशाखा
- डॉ. शुभांगी पाटील, सहायक प्राध्यापक, विद्यार्थी सेवा विभाग
- प्रा. विजयकुमार पाईकराव, सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
- डॉ. सुभाष सोनुने, सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
- डॉ. राजकुमार ननवरे, शैक्षणिक संयोजक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,निमंत्रित सदस्य
- श्रीम. स्नेहल मांजरेकर, शैक्षणिक संयोजक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, निमंत्रित सदस्य
- श्रीम. वर्षा बहिरम , शैक्षणिक संयोजक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, निमंत्रित सदस्य
- डॉ. साधना लामतुरे,शैक्षणिक संयोजक, दिव्यांग अध्ययन केंद्र,निमंत्रित सदस्य
- श्री. ज्ञानेश्वर जाधव, शैक्षणिक संयोजक, दिव्यांग अध्ययन केंद्र, निमंत्रित सदस्य
- श्री. शिवानंद कहाळेकर,शैक्षणिक संयोजक, दिव्यांग अध्ययन केंद्र, निमंत्रित सदस्य

**काही अपरिहार्य कारणास्तव खालील सदस्य बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत.**

- डॉ. अमृत भारवाड, वरिष्ठ प्राध्यापक, गुजरात युनिव्हर्सिटी
- डॉ. संजय चाकणे, पुणे (विद्वत परिषद सदस्य )
- डॉ. दयाराम पवार, सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा

सदरच्या बैठकीमध्ये ठेवण्यात आलेले विषय व सर्वानुमते घेतलेले निर्णय पुढीलप्रमाणे.

| क्रमांक | विषय |
|---|---|
| 66.0 | **उपस्थित सदस्यांचे स्वागत विजयकुमार पाईकराव यांनी केले.** |
| 66.01 | **विषय क्र. बी.-1/एफ-186/ 2025/ 01**<br>**विषय :** शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. ६४ च्या इतिवृत्तास मान्यता देणे.<br>**निर्णय :** ६४ व्या परिषदेचे इतिवृत्तवाचन करून विषय क्रमांक ६४.१५ सोडून इतर विषयांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>**विषय क्र. 64.15 विषय क्र. बी.-1/एफ-182/2025/15**<br>**विषय : सेवांतर्गत बी.एड. शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना समाजसेवा प्रात्यक्षिका अंतर्गत नवीन प्रात्यक्षिक समाविष्ट करणेबाबत.**<br>**टिपणी :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेचे माजी संचालक मा. प्रा. अनंत जोशी ह्यांनी गीतेतील निवडक श्लोकांच्या आधारे द्विशतपदी भगवद गीता यातील अध्याय व त्यातील श्लोक घेऊन त्या श्लोकाचा मराठी भावानुवाद असे पुस्तकाचे विकसन केलेले आहे. त्यांनी हे पुस्तक बी.एड. सेवांतर्गत शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना समाजसेवा प्रात्यक्षिकाअंतर्गत प्रात्यक्षिक कार्य म्हणून घेण्याबाबतचे पत्र संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना दिलेले आहे. समाजसेवा प्रात्यक्षिक कार्यात समावेश करण्यासाठी शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेसमोर सदर विषय चर्चा आणि मान्यतेस्तव सादर...<br>**निर्णय :** डॉ. अनंत जोशी यांच्याकडून शिक्षणशास्त्र विद्याशाखेला पत्र देण्यात आले होते. म्हणून हा विषय शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद झाल्यानंतर सविस्तर चर्चेसाठी Whatsaap द्वारे दिनांक ०७/०४/२०२५ रोजी सर्व सन्मानीय सदस्यांना पाठविण्यात आला होता. तसेच टिपणी, पुस्तकाचे मुखपृष्ठ देखील देण्यात आले होते. या विषयाला प्रा. प्रवीण घोडेस्वार यांनी सदर विषय प्रत्यक्ष बैठकीत मांडावा असे मेसेज वर म्हटले त्यानंतर निर्णय घ्यावा असे मत मांडलेले होते.<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद क्र. ६५ ही बैठक अभ्यासकेंद्र निकष मान्यतेसाठी तातडीने घेण्यात आली होती. त्यामुळे शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्रमांक ६४ चे वृत्तांत त्यावेळी मान्यतेसाठी ठेवण्यात आलेले नव्हते म्हणून बैठक क्र. ६४ आणि ६५ या दोन्ही बैठकींचे इतिवृत्त दिनांक ११/०७/२०२५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मान्यतेसाठी ठेवले होते.<br>वरील विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सेवांतर्गत बी.एड. शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना प्रा. अनंत जोशी यांनी लेखन केलेल्या भगवद्गीतेतील निवडक श्लोकांची पुस्तिका ही समाजसेवा प्रात्यक्षिकाअंतर्गत समाविष्ट करता येणार नाही, तसेच NCTE चा नवीन Curriculum आल्यानंतर याबाबत तज्ज्ञ सल्लागार समितीमध्ये ठरवावे. असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.<br>**(सहपत्र १)** |
| 66.02 | **विषय क्र. बी.-1/एफ-186/ 2025/ 02**<br>**विषय :** शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. ६४ च्या कार्यवाही अहवालाची माहिती देणे.<br>**निर्णय :** ६४ वी परिषदेच्या कार्यवाही अहवालाची माहिती मा.अध्यक्ष यांनी दिली. विषय क्र. ६४.१५ वगळता इतर विषयांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>**(सहपत्र २)** |

| | |
|---|---|
| 66.03 | **विषय क्र. बी.-1/एफ-186/ 2025/ 03**<br>**विषय :** शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. ६५ च्या इतिवृत्तास मान्यता देणे.<br>**निर्णय :** ६५ व्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्तवाचन करून सर्वानुमते मान्यता देण्यात आली. **(सहपत्र ३)** |
| 66.04 | **विषय क्र. बी.-1/एफ-186/ 2025/ 04**<br>**विषय :** शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. ६५च्या कार्यवाही अहवालाची माहिती देणे.<br>**निर्णय :** ६५ व्या परिषदेच्या कार्यवाही अहवालाची माहिती मा.अध्यक्ष यांनी करून दिली. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. **(सहपत्र ४)** |
| 66.05 | **विषय क्र. बी.-1/एफ-186/ 2025/ 05**<br>**विषय : YCMOU Ph.D. Working Ordinance २०२५**<br>**टिपणी :** विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रसिद्ध केलेल्या Ph.D. Ordinance २०१६, १६ ऑक्टोबर २०१८ व ७ नोव्हेंबर २०२२ च्या धर्तीवर YCMOU Ph.D. Ordinance २०२३ तयार करण्यात आलेला होता. परंतु UGC, New Delhi यांच्या सोबत झालेल्या Review Committee Meeting मध्ये त्यांनी Regulation २०२२ आधारे Ph.D. शिक्षणक्रमाची पूर्णतः अंमलबजावणी करावे असे निर्देश दिलेले आहेत.<br>शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पी.एच. डी.प्रवेश आणि इतर नियमावली बावत YCMOU २०२३ Ph.D. Ordinance मध्ये दुरुस्तीसाठी **Working Ordinance** करण्यास मान्यता मिळावी. YCMOU २०२३ Ph.D. Ordinance सहपत्र ५ मध्ये दिलेला आहे.<br>**निर्णय :** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पीएच.डी. प्रवेश आणि इतर नियमावली बाबत YCMOU २०२३ Ph.D. Ordinance मध्ये दुरुस्तीसाठी **Working Ordinance** करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. **(सहपत्र ५)** |
| 66.06 | **विषय क्र. बी.-1/एफ-186/ 2025/ 06**<br>**विषय : उच्च शिक्षण पदविका शिक्षणक्रम PPF आणि संरचना मान्यतेबाबत...**<br>**टिपणी :** उच्च शिक्षण पदविका शिक्षणक्रम तज्ञ सल्लागार समिती बैठक दि. १७/०४/२०२५ रोजी च्या PPF आणि शिक्षणक्रम संरचना विकसना संदर्भात घेण्यात आली. या बैठकीचे इतिवृत्त आणि शिक्षणक्रम PPF व संरचना सोबत जोडलेले आहे. चर्चा व मान्यतेसाठी सादर<br>**निर्णय :** उच्च शिक्षण पदविका शिक्षणक्रम तज्ञ सल्लागार समिती दि. १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त आणि शिक्षणक्रम PPF व संरचना यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. **(सहपत्र ६)** |
| 66.07 | **विषय क्र. बी.-1/एफ-186/2025/07**<br>**विषय : डिझाईन थिंकिंग च्या आधारे उद्योजकता विकास (Design thinking for Entrepreneurship Development) MOOC विकसनाबाबत....**<br>**टिपणी :** डिझाईन थिंकिंगच्या आधारे उद्योजकता विकास या ४ श्रेयांक असलेल्या अभ्यासक्रमाचा पी पी आर आणि संरचनेस महाज्ञानदीपद्वारे मूक विकसन करण्यास तत्त्वतः |

| | |
|---|---|
| | मान्यता मिळाली असून शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेमध्ये आशय लेखक व विषयतज्ञ यांच्या नावांना कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.<br>आशय लेखक विषयतज्ञ नावे :<br>१. डॉ. श्री. दीपक तातपुजे<br>२. डॉ. अर्पिता कठाणे<br>३. डॉ.राजेश्वरी पाटील<br>४. डॉ.संजीवनी महाले<br>५. डॉ. राजकुमार ननवरे<br>६. डॉ.गणेश लोखंडे<br>**समन्वयक** : प्रा.संजीवनी महाले<br>**सह समन्वयक** : प्रा. राजकुमार ननवरे<br>**निर्णय** : डिझाईन थिंकिंगच्या आधारे उद्योजकता विकास (MOOC कोर्स) पी पी एफ आणि अभ्यासक्रम संरचना आशय लेखक व विषयतज्ञ यांच्या नावाला सर्वानुमते मान्यता देण्यात आली. अवश्यकतेनुसार अधिक आशय लेखक आणि विषय तज्ञांची आवश्यकता भासल्यास त्याचे अधिकार संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा ह्यांना देण्यात आले. **(सहपत्र ७)** |
| 66.08 | **विषय क्र.बी.-1/एफ-186/2025/08**<br>**विषय : "शिक्षकांसाठी ए.आय" (AI for Teachers) MOOC विकसनाबाबत...**<br>**टिपणी : "शिक्षकांसाठी ए.आय"** या २ श्रेयांक असलेल्या MOOC विकसनासाठी पी पी एफ आणि संरचना महाज्ञानदीपद्वारे विकसित करण्यास तत्त्वतः मान्यता मिळाली असून शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेमध्ये आशय लेखक व विषयतज्ञ यांच्या नावांना कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.<br>आशय लेखक विषय तज्ञ नावे :<br>डॉ.प्रकाश खणाळे<br>**समन्वयक** : प्रा सुभाष सोनुने<br>**सह समन्वयक** : प्रा. राजकुमार ननवरे<br>**निर्णय** : "शिक्षकांसाठी ए.आय" (मूक कोर्स) पी पी आर - आणि अभ्यासक्रम संरचनास मान्यता देण्यात आली. आवश्यकतेनुसार आशय लेखक व विषयतज्ञांची गरज भासल्यास त्यांच्या निवडीचे अधिकार संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा ह्यांना देण्यात आले. **( सहपत्र ८)** |
| 66.09 | **विषय क्र. बी.-1/एफ-186/ 2025/ 09**<br>**विषय : एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम : अभ्यासकेंद्र समन्वयक**<br>**टिपणी** : एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम पदव्युत्तर पदवीसाठी असल्याकारणाने NEP 2020 नुसार संशोधन अहवाल कार्य अनिवार्य आहे. संशोधन मार्गदर्शक पीएच.डी./ एम.फिल धारक असतो. काही अपरिहार्य कारणांमुळे संशोधन मार्गदर्शक मार्गदर्शन करू शकत नसेल किंवा त्यांची बदली किंवा महाविद्यालय सोडून गेल्यास विद्यार्थ्यांना नवीन संशोधन मार्गदर्शक किंवा अभ्यासकेंद्र समन्वयकाला ते कार्य करावे लागते. ते अभ्यासकेंद्र प्रमुख प्राचार्य असतात. ते इतर कार्यबाहुल्यामुळे वेळ देऊ शकले नाही. अश्यावेळी अभ्यासकेंद्र समन्वयक हे शिक्षणशास्त्रातील पीएच.डी./ एम.फिल धारक असल्यास त्यांना सदरील विद्यार्थ्याला मार्गदर्शन करता येईल. अभ्यासकेंद्र समन्वयक हा पीएच.डी./ एम.फिल धारक असावा. त्यांचे पी.एच.डी.चे कार्य अंतिम टप्प्यात असून आणि त्यांना पारंपारिक विद्यापीठाची मान्यता असल्यास समन्वयक |

| | |
|---|---|
| | म्हणून कार्य करण्यासाठी चर्चा व मान्यतेसाठी सादर.<br>**निर्णय :** UGC च्या नियमानुसार विषयातील पदव्युत्तर पदवी आणि शिक्षणशास्त्रातील पदव्युत्तर पदवी अधिक नेट / सेट परीक्षा उत्तीर्ण असल्यास आणि पारंपारिक विद्यापीठाची शिक्षक प्रशिक्षक म्हणून मान्यता असणारे समन्वयक पात्र करण्यात यावे. असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. |
| 66.10 | **विषय क्र. बी.-1/एफ-186/ 2025/ 10**<br>**विषय : एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम पुनर्रचना PPF, शिक्षणक्रम संरचना आणि तज्ञ सल्लागार समिती बैठक वृतांत मान्यतेबाबत :**<br>**टिपणी :** एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमासाठी पुनर्रचनेसंबंधि तज्ञ सल्लागार समिती बैठक दि. ०९/०७/२०२५ रोजी घेण्यात आली. या बैठक PPF आणि शिक्षणक्रम संरचना अंतिम करण्यात आलेली आहे. एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम पी पी एफ, शिक्षणक्रम संरचना आणि तज्ञ सल्लागार समिती बैठक वृतांत मान्यतेसाठी सादर.<br>**निर्णय :** . एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम पी पी एफ, शिक्षणक्रम संरचना आणि तज्ञ सल्लागार समिती बैठक वृतांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. **(सहपत्र ९)** |
| 66.11 | **विषय क्र. बी.-1/एफ-186/ 2025/ 11**<br>**विषय : बी.एड. विशेष शिक्षण (HI, VI, ID) शिक्षणक्रमाच्या पुनरचना PPF आणि शिक्षणक्रम संरचना मान्यतेबाबत.....**<br>**टिपणी :** भारतीय पुर्नवास परिषद (RCI) नवी दिल्ली यांचे निकषानुसार विद्यापीठात बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रम कार्यान्वित केला जातो. सदर शिक्षणक्रमाचा अभ्यासक्रम RCI ने प्रसिद्ध करून सन २०२४ पासून नवीन अभ्यासक्रम अंमलबजावणी करण्याचे सूचित केले आहे. मा.कुलगुरूंकडून ह्या शिक्षणक्रमाची पुनर्रचना करण्यासाठी तज्ज्ञ सल्लागार समितीच्या नावांना मान्यता घेण्यात आली आहे. तज्ज्ञ सल्लागार समिती सदस्यांच्या नावांना शिक्षणशास्त्र विद्याशाखेपुढे कार्योत्तर मान्यतेसाठी सादर..<br>RCI ने २०२४ साली दिलेल्या बी.एड. विशेष शिक्षण अभ्यासक्रमाच्या संरचनेनुसार बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाच्या तज्ञ सल्लागार समितीची बैठक दिनांक ११/०७/२०२५ रोजी घेण्यात आली. या बैठकीत बी.एड. विशेष शिक्षण (HI, VI, ID) शिक्षणक्रमाचा PPF आणि शिक्षणक्रम संरचनेत अंतिम स्वरुप देण्यात आले. ज्या प्रवेशार्थीनी विशेष शिक्षणातील डी.एड./बी.एड. केलेले आहे आणि ज्यांना RCI क्रमांक आहे त्यांच्यासाठी दोन वर्षाचा शिक्षणक्रम असावा आणि जे फक्त पदवी किंवा पदव्युत्तर पदवीच्या आधारे प्रवेश घेतील. त्यांचा २ वर्षाचा शिक्षणक्रम पूर्ण झाल्यानंतर सहा महिन्यांची आंतरवासिता (श्रेयांक विहीन Non Credit) केल्यानंतर त्यांना पदवी देण्यात यावी असा निर्णय घेण्यात आलेला आहे . शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे मान्यतेसाठी सादर...<br>**निर्णय :** बी.एड. विशेष शिक्षण (HI, VI, ID) शिक्षणक्रमाचे पुनर्विकसन करण्यासाठी तज्ज्ञ सल्लागार समितीच्या नावांना सर्वानुमते कार्योत्तर मान्यता देण्यात आली .<br>दिनांक ११/०७/२०२५ रोजी झालेली बी.एड.विशेष शिक्षण तज्ञ सल्लागार समिती बैठक वृतांत, शिक्षणक्रमाचा PPF आणि शिक्षणक्रम संरचनेत सर्वानुमते मान्यता देण्यात आली. **(सहपत्र १०)** |

| | |
|---|---|
| 66.12 | **विषय क्र. बी.-1/एफ-186/ 2025/ 12**<br>**विषय : 'अध्ययन अक्षमता (Learning Disability)' विषयक MOOC विकसनास मान्यता मिळविणेबाबत..**<br>**टिपणी :** शैक्षणिक क्षेत्रामध्ये अध्ययन अक्षमता असलेल्यां विद्यार्थ्यांचे प्रमाण लक्षणीय असून, त्यांना योग्य मार्गदर्शन, विशेष अध्यापन पद्धती आणि संवेदनशील दृष्टिकोनाची आवश्यकता आहे. पारंपरिक शिक्षण व्यवस्थेत सर्वसामान्य शिक्षक व पालक यांच्याकडे अध्ययन अक्षमता ओळखण्याचे व त्यानुसार शिक्षण देण्याचे आवश्यक प्रशिक्षण पुरेसे उपलब्ध नाही.<br>या पार्श्वभूमीवर, 'अध्ययन अक्षमता' विषयक MOOC (Massive Open Online Course) विकसित करणे ही काळाची गरज आहे.<br>MOOC द्वारे अध्ययन अक्षमता क्षेत्रातील जागरूकता वाढेल, अशा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल. शिक्षकांना योग्य ती दिशा देण्यासाठी 'अध्ययन अक्षमता' विषयक MOOC विकसनाचा विषय शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे चर्चा व मान्यतेसाठी सादर..<br>**निर्णय :** 'अध्ययन अक्षमता (Learning Disability)' विषयक MOOC विकसनास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 65.13 | **विषय क्र. बी.-1/एफ-186/ 2025/13**<br>**विषय : शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील पुनर्रचित '(P-10) शालेय व्यवस्थापन पदविका' (DSM) या शिक्षणक्रमाच्या अभ्यासक्रम विकसनासाठी लेखकांच्या नावांचा समावेश करण्याबाबत...**<br>**टिपणी :** "शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे राबविण्यात येणाऱ्या '(P-10) शालेय व्यवस्थापन पदविका' (DSM) या शिक्षणक्रमाचे पुनर्रचना कार्य चालू आहे. त्यात एकूण ०५ अपूर्ण अभ्यासक्रम आहेत. या अभ्यासक्रमातील काही घटकांचे लेखन कार्य अपूर्ण आहे. सोवत नव्याने लेखकांच्या नावांची यादी तयार करण्यात आलेली आहे. ती सोबत दिलेली आहे. लेखकांच्या नावास मान्यता देण्यात यावी. तरी सदर विषय विद्याशाखा परिषदेसमोर चर्चा व मान्यतेसाठी सादर...<br>**निर्णय :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील पुनर्रचित '(P-10) शालेय व्यवस्थापन पदविका' (DSM) या शिक्षणक्रमाच्या अभ्यासक्रम लेखकांची नावे समाविष्ट करण्याला सर्वानुमते मान्यता देण्यात आली. लेखक संपादकांची गरज भासल्यास संचालकांना निवडी बाबतचे अधिकार देण्यात आले. **(सहपत्र ११)** |
| 66.14 | **विषय क्र. बी.-1/एफ-186/ 2025/ 14**<br>**विषय: शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत 'ब्रेन बेस्ड लर्निंग'(मेंदू आधारित अध्ययन) प्रमाणपत्र शिक्षणक्रम हा नव्याने सुरु करणेबाबत...**<br>**टिपणी :** "शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत 'ब्रेन बेस्ड लर्निंग' प्रमाणपत्र शिक्षणक्रम हा नव्याने सुरु करावयाचा आहे. तरी सदर शिक्षणक्रम सुरु करण्यासाठी विद्याशाखा परिषदेसमोर चर्चा व मान्यतेसाठी सादर.<br>**निर्णय :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत 'ब्रेन बेस्ड लर्निंग'( मेंदू आधारित अध्यन) प्रमाणपत्र शिक्षणक्रम हा शिक्षणक्रम नव्याने सुरु करण्यासाठी तत्वता मान्यता दिली. मात्र सदर शिक्षणक्रमासाठी सुटसुटीत सुलभ अर्थपूर्ण नाव देण्याचे सर्वानुमते सूचित करण्यात आले. |

| | |
|---|---|
| 66.15 | **विषय क्र. बी.-1/एफ-186/ 2025/ 15**<br>**विषय : शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमास GD Art पात्रता असणा-या प्रवेशार्थींना प्रवेश देणेबाबत..**<br>**टिप्पणी** : शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम कार्यान्वित आहे.<br>सदरील शिक्षणक्रमास<br>१) यु.जी.सी. मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवीधर व्यक्ती<br>**किंवा**<br>२) मुख्याध्यापक / उपमुख्याध्यापक असे नियुक्तपत्र असलेल्या व्यक्तीना प्रवेश दिला जातो.<br>३) महाराष्ट्र शासन कला संचालनालनाची AM पात्रता धारण करणा-या प्रवेशार्थींना देखील प्रवेश दिला जातो.<br>मात्र याच बरोबर महाराष्ट्र शासन कला संचालनालनाची (GD Art) ही पात्रता धारण करणारे प्रवेशार्थी देखील शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम करण्यासाठी उत्सुक आहेत. त्याबाबत सौ. स्वाती दिलीप गडाख यांनी तसा लेखी अर्ज विद्याशाखेकडे सादर केला आहे.<br><br>Government of Maharashtra Higher ART Examinations Diploma (GD Art) हा शिक्षणक्रम युजीसी अंतर्गत येत नसून तो DIRECTORATE OF ART MAHARASHTR STATE या अंतर्गत येतो. त्यामुळे (GD Art) प्राप्त प्रवेशार्थींना या शिक्षणक्रमासाठी प्रवेश देण्यात येत नव्हता. तशी मागणी सदरील पात्रता धारण करणा-या व्यक्तीकडूनही विद्यापीठाकडे आलेली नव्हती. The Maharashtra Zilha Parishads District Services (Recruitment) Rules, 1967 1990 मधील परिशिष्ट - २ मधील नियमानुसार जी.डी.आर्ट वा डी.एम.सी. वा ए.टी.डी. १० वर्षांच्या सेवेसह त्यास बी.एड.ला समकक्ष धरावे असे नमूद केलेले आहे. परंतु परिशिष्ट २ झेरॉक्स आहे.त्याचे मूळ कागतपत्रे सदर उमेदवाराकडे किंवा वेबसाईटवर उपलब्ध नाहीत. परंतु उमेदवार वरील परिशिष्टाचा आधार घेऊन DSM प्रवेशाची मागणी करीत आहे.<br>ATD, GD ART DIPLOMA आणि दहा वर्ष सेवा असणाऱ्यांना शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून प्रवेश देण्यास मान्यता देण्यासाठी प्रस्ताव चर्चा व मान्यतेस्तव सादर..<br>**निर्णय** : ATD, GD ART हा शिक्षणक्रम UGC मान्यताप्राप्त पदवी शिक्षणक्रमाशी समकक्ष आहे किंवा नाही याबाबत कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून लेखी मार्गदर्शन मागवण्यात यावे असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. संबधित उमेदवारानेही त्याबाबत कला संचालनालयाशी संपर्क साधून पदवी समकक्षतेबाबतचे शासन निर्णय सादर केल्यास त्यना DSM ला प्रवेश देण्यात यावा. **(सहपत्र १२ )** |

| | |
|---|---|
| 66 | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळीचे विषय** |
| 66 .16 | **विषय क्र. बी.-1/एफ-186/ 2025/ 16**<br>**विषय : शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षात प्रवेश करण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांच्या माहिती पुस्तिका कार्योत्तर मान्यतेसाठी सादर ..**<br>**निर्णय :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत सन २०२५-२०२६ साली प्रवेश करण्यात येणाऱ्या सर्व शिक्षणक्रमांच्या माहिती पुस्तिकेस सर्वानुमते कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |
| 66 .17 | **विषय क्र. बी.-1/एफ-186/ 2025/17**<br>**विषय : शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्र प्रवेश तुकडी संख्या निश्चिती बाबत...**<br>**टिपण्णी :**शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमासाठी अभ्यासकेंद्रावर एक तुकडी विद्यार्थी संख्या कमाल ६० असावी अभ्यासकेंद्राने अतिरिक्त तुकडीची मागणी केल्यास फक्त ज्यादा एक तुकडी ६० ची देण्याबाबत चर्चा व मान्यतेसाठी सादर..<br>**निर्णय :** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम एक तुकडी कमाल ६० प्रवेश आणि अतिरिक्त ६० एक तुकडी देण्यात सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 66 .18 | **विषय क्र. बी.-1/एफ-186/ 2025/ 18**<br>**विषय : शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्राबाबत..**<br>**टिपण्णी :** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम हा डी. एड / बी. एड. विद्यालय / महाविद्यालय यामध्ये कार्यान्वित केला जातो. मात्र मागील काही वर्षामध्ये सदरील शिक्षणक्रम डी. एड / बी. एड. विद्यालय / महाविद्यालय नसलेल्या ठिकाणी कार्यान्वित केला गेला. मात्र नियमाप्रमाणे डी. एड / बी. एड. विद्यालय / महाविद्यालयातच कार्यान्वित करणे अपेक्षित आहे. सदर विषय शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद क्र. ६५ दिनांक ३०/०५/२०२५ मध्ये ठेवण्यात आलेला होता.<br>**निर्णय :** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या डी .एड.व बी.एड. महाविद्यालयातील अभ्यासकेंद्रांना देण्याबाबत ६५ व्या बैठकीत झालेला निर्णय तसाच ठेवण्यात यावा असा सर्वानुमते निर्णय देण्यात आला. |
| 66 .19 | **विषय क्र. बी.-1/एफ-186/ 2025/ 19**<br>**विषय : शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या वतीने डॉ. मधुभाई बुच कृतज्ञता पुरस्कार, डॉ.रविंद्र दवे प्रेरणा पुरस्कार आणि डॉ. आनंद वास्कर उत्कृष्ट शिक्षण ग्रंथ पुरस्कार देणेबाबत...**<br>**टिपणी :** माजी शिक्षणशास्त्र विद्याशाखेचे संचालक प्रा. अनंत जोशी याचे मार्गदर्शनात विद्याशाखेतील अध्यापकवृंद, शिक्षणशास्त्रातील महनीय तज्ञ आणि डॉ. मधुभाई बुच, डॉ.रविंद्र दवे,आणि डॉ. आनंद वास्कर यांच्या परिवारातील सदस्यांनी दिलेल्या आर्थिक रु. ३ लक्ष योगदानातून २००३ पासून वरील पुरस्कार विद्याशाखेतील शिक्षकवृंदाच्या वतीने अनौपचारिक स्वरुपात दिले जात होते. परंतु या पुरस्कारास औपचारिक स्वरूप प्राप्त व्हावे याबाबत सर्वांचेच एकमत होते. त्यासाठी तसे प्रयत्नही बऱ्याच शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील अध्यापकवृंदानी केले. मात्र विद्यमान कुलगुरू प्रा.संजीव सोनवणे ह्यांना ह्या संकल्पनेस सत्वर मान्यता देऊन विद्यापीठाच्या वतीने सदर पुरस्कार देण्यासाठी रु. ७ लक्ष निधी देण्याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिली. अशा प्रकारे एकत्रित रु. १० लक्ष च्या वार्षिक व्याजातून हे |

| | |
|---|---|
| | पुरस्कार देण्याची सुरुवात राष्ट्रीय शिक्षक दिन ५ सप्टेंबर / आंतरराष्ट्रीय शिक्षक दिन ५ ऑक्टोबर निमित्त वितरीत केले जावेत किंवा विद्यापीठाच्या सोयीनुसार अन्य दिनांक निश्चित करून असे मार्गदर्शन केले. सदर विषय शिक्षणशास्त्र विद्याशाखेसमोर कार्योतर मान्यतेसाठी सादर<br>**निर्णय :** शिक्षणशास्त्र विद्याशाखे मार्फत डॉ.मधुभाई बुच कृतज्ञता पुरस्कार,डॉ. रविंद्र दवे प्रेरणा पुरस्कार आणि डॉ. आनंद वास्कर उत्कृष्ट शिक्षण ग्रंथ पुरस्कार देण्याच्या निर्णयाचे सर्वानुमते स्वागत करण्यात आले.आणि मा. कुलगुरू प्रा.संजीव सोनवणे व व्यवस्थापन मंडळाचे धन्यवाद व्यक्त करण्यात आले. |

शेवटी विजयकुमार पाईकराव यांनी सर्वांचे आभार मानले आणि सहविचार बैठक संपल्याचे अध्यक्षांच्या परवानगीने सांगण्यात आले.

**प्रा. विजयकुमार पाईकराव**
सचिव, शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

**प्रा. संजीवनी महाले**
अध्यक्ष, शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद
तथा संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा

मा. कुलगुरू, कृपया मान्यतेसाठी सविनय सादर.

**मान्य / अमान्य**

मान्य

**मा. कुलगुरु**

1/7/25